दि. २५ ऑगस्ट १९९५

मा. श्री. शिवणकर
मंत्री, पाटबंधारे व सिंचन विभाग
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई - ३२

मा. मंत्रिमहोदय,

दुष्काळाच्या आणि पाणीटंचाईच्या छायेत महाराष्ट्रातील बराच मोठा प्रदेश यावर्षी येत आहे. या पार्श्वभूमीवर काही मुद्दे आपल्यासमोर सादर करण्याचे धाडस या पत्राद्वारे करीत आहे.

१. विदर्भातील अनेक जिल्ह्यात असंख्य तळी व जलाशय आहेत. त्यांपैकी काही बरेच जुने आहेत. या तळ्यांनी आपापली वैशिष्ट्यपूर्ण परिसंस्था निर्माण केलेली आहे. अनेक दुर्मिळ वनस्पती व पशु-पक्षी त्यांच्या परिसरात आश्रय घेऊन आहेत. या सर्व जलाशयांची जैविक पाहणी करणे, त्यांतून अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण तळ्यांची निवड करणे, त्यांचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या योजना तयार करून त्या कार्यान्वित करणे यांस अग्रक्रम आता ही विनंती. महाराष्ट्रातील जैविक विविधता (Bio-diversity) जपण्याच्या दृष्टीने हे काम अत्यावश्यक आहे. याचा उपयोग पुढे नवीन औषधे, खाद्य, फळांच्या जाती, उद्योगोपयोगी कच्चा माल, इंधन, चारा वगैरे प्राथमिक गरजा पुरविणे यांसाठी होईल.

२. धरणे व कालवे यांवर आधारित पाणी-व्यवस्थापनाला पूरक म्हणून तळी आणि ओढे व नद्या यांच्या परिसंस्थांचे पुनरुज्जीवन करणे अत्यंत आवश्यक आहे. या द्वारे भूपृष्ठाखालील प्रवाहांना पाणी-पुरवठा होऊन नदी-नाल्यापासून दूरदूरच्या भागातील विहिरींना पाणी-पुरवठा होतो, असा अनुभव आहे. जलचक्र अबाधित राहण्याच्या दृष्टीने ओढे व नद्या यांच्या काठचे विशिष्ट आसरे व वनस्पतिजीवन यांचे पुनरुज्जीवन होणे आवश्यक आहे. त्यामुळे शेत-जमिनीत आर्द्रतेचे प्रमाण वाढते, शिवाय चारा, इंधन, लाकूड, मासे-उत्पादन यांस चालना मिळते. सध्या धरणे व कालवे यांवर लक्ष केंद्रित झाल्याने नद्या व ओढे यांची पात्रे पूर्ण निकामी झाली आहेत, व त्यांच्यावर अवलंबून असणारे वनस्पती व प्राणिजीवन लयास जाऊ लागले आहे. मानवी जीवनावरही त्याचा विपरीत परिणाम होऊन प्राथमिक गरजेच्या वस्तूंची प्रचंड टंचाई निर्माण झाली आहे. नैसर्गिक परिसंस्थांचे पुनरुज्जीवन ही आजची निकड आहे.

३. धरणे व कालवे यांवर आधारित पाणी-व्यवस्थापन पद्धतीमध्ये तळी, नैसर्गिक जलाशय, ओढे व नद्या यांचे पुनरुज्जीवन या

गोष्टी समाविष्ट करून पाणी-व्यवस्थापन सर्वंकष कसे करावे, ज्यापासून माणूस व निसर्ग या दोहोंना उत्कर्ष होईल असा समन्वय कसा साधावा, यांवर आधारीत प्रशिक्षण, वाल्मी संस्था, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सहकार्याने शासकीय अभियंत्यांसाठी गेली ४ वर्षे देत आहे. पाटबंधारे खात्याच्या सुमारे ६०० अभियंते-अधिकाऱ्यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला आहे. या प्रशिक्षणास अभियंत्यांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या प्रशिक्षणातील नवीन कल्पना प्रत्यक्षात उतरवून काही अभियंत्यांनी पाणलोट व लाभक्षेत्रात त्यांचे फायदेही निदर्शनास आणून दिले आहेत.

४. अशा रीतीने पाणी-व्यवस्थापन जितके सर्वंकष व निसर्ग-परिसंस्थांना पोषक ठरेल, तितका अवर्षण काळात जनतेला त्रास कमी होईल. त्यासाठी सर्वोच्च पातळीवरून या सर्वंकष पाणी-व्यवस्थापन पद्धतीचा पाठपुरावा होणे आणि ती सर्व प्रकल्पांवर अंमलात येणे अत्यंत आवश्यक आहे.

तरी पाटबंधारे खात्याच्या अधिकाऱ्यांना अशा सर्वंकष पाणी-व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करण्याला आदेश आपण द्यावा अशी विनंती आहे.

राज्यातील पाणी-टंचाईशी युद्धपातळीवर मुकाबला करण्याची घोषणा मा. मुख्यमंत्र्यांनी केली आहे. तिच्या पूर्तीसाठी वरील गोष्टींची अत्यंत निकड आहे.

यातील तपशीलाची चर्चा करण्यास आम्हास आनंद होईल.

कळावे, लोभ असावा,

आपला,

प्रकाश गोळे
संचालक.